आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता

३ ऑक्टोबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरात आजपासून शारदीय नवरात्रौत्सवाला प्रारंभ
- खादी उद्योगाची उलाढाल गेल्या आर्थिक वर्षात एक लाख पंचावन्न हजार कोटी रुपयांच्या वर
- इस्त्रायल-लेबनॉनमधल्या तणावामुळे विमानसेवा प्रभावित
- हैदराबाद क्रिकेट असोसिएशनशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीकडून मोहम्मद अझरुद्दीन याला समन्स जारी

**आणि**

- महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेला आजपासून शारजाह इथं सुरुवात

<><><><><>

देशभरात आजपासून शारदीय नवरात्रोत्सवाला उत्साहाने प्रारंभ झाला आहे. आजपासून पुढचे नऊ दिवस दुर्गा देवीच्या नऊ रुपांचं पूजन केलं जाईल. आज पहिल्या दिवशी दुर्गेच्या शैलपुत्री या रुपाची पूजा केली जाते. नवरात्रोत्सवानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. आदिशक्तीच्या आराधनेला समर्पित असलेला हा सण सर्वांना शुभदायी ठरो. आई शैलपुत्रीचा कृपाशिर्वाद सर्वांना मिळो, अशी कामना त्यांनी आपल्या संदेशातून व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रातही तुळजापूरची तुळजाभवानी, कोल्हापूरची अंबाबाई, वणीची सप्तशृंगी आणि माहूरची रेणुका या साडेतीन शक्तीपीठांच्या मंदिरांमध्येही नवरात्रोत्सवाला

प्रारंभ झाला आहे. मुंबईतही मुंबादेवी आणि महालक्ष्मी यांच्या मंदिरांमध्ये या उत्सवाला सुरुवात झाली आहे.

<><><><><>

केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयानं सूतकताई कामगार आणि हातमाग विणकरांच्या वेतनात वाढ केली आहे. त्यानुसार आता सूतकताई कामगारांना २५ टक्के तर हातमाग विणकरांना ७ टक्के अधिक वेतन मिळेल. गेल्या १७ सप्टेंबरला जाहीर झालेला हा निर्णय कालपासून लागू झाला आहे. खादी आणि ग्रामोद्योग आयुक्त मनोज कुमार यांनी सांगितलं की प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात खादी उद्योगातल्या कामगारांच्या वेतनात एकूण २१३ टक्के वाढ झाली आहे.त्यामुळे या क्षेत्रातल्या कामगारांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला असल्याचं ते म्हणाले.  खादी उद्योगाची उलाढाल गेल्या आर्थिक वर्षात एक लाख पंचावन्न हजार कोटी रुपयांच्या वर गेल्याची माहिती त्यांनी दिली. ग्राहकांना खादी उत्पादनांवर २० टक्के तर ग्रामोद्याग उत्पादनांवर १० टक्के सवलत मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.  आजपासून सुरु झालेला हा सेल येत्या ३० ऑक्टोबर पर्यंत चालणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा रेडिओच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधण्याच्या मन की बात हा  विशेष कार्यक्रम सुरु झाल्याला आज १० वर्ष पूर्ण झाली. प्रधानमंत्र्यांनी २०१४मध्ये आजच्या दिवशी पहिल्यांदा या कार्यक्रमातून जनतेशी थेट संवाद साधला होता. आजवर या कार्यक्रमाच्या विविध भागात प्रधानमंत्र्यांनी सर्वसामान्य माणसाचं जीवन प्रभावित करणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण विषयक मुद्द्यांवर चर्चा केली आहे. मन की बात हा कार्यक्रम प्रधानमंत्र्यांशी संवाद साधण्याचं जनतेचं एक महत्वपूर्ण माध्यम बनला आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना देश विदेशात भेट स्वरूपात मिळालेल्या वस्तूंच्या  इ-लिलावाची तारीख आता ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. पूर्वी हा लिलाव १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत होणार होता. प्रधानमंत्र्यांना मिळालेल्या भेट वस्तूंच्या लिलावाची ही ६वी आवृत्ती असून यातून मिळणारं धन नमामि गंगे प्रकल्पासाठी  वापरलं जाणार असल्यामुळे नागरिकांनी मोठया संख्येनं लिलावात बोली लावून या कार्यात योगदान द्यावं, असं आवाहन सरकारनं केलं आहे. उत्कृष्ट कलाकृती, मंदिरांच्या प्रतिकृती, हिंदू देवतांच्या मूर्ती आणि पॅरालिम्पिक खेळाडूंचे बूट अश्या विविध प्रकारच्या सुमारे सहाशे वस्तू  यावर्षी लिलावात मांडण्यात आल्या आहेत.

<><><><>

झारखंड येथे होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजप आजपासून आपला जाहीरनामा प्रसिद्ध करणार आहे. आसामचे मुख्यमंत्री आणि झारखंड विधानसभा निवडणुकीचे सहप्रभारी हिमंत बिस्वा सरमा यांनी आज रांची इथे वार्ताहर प्रतिनिधींशी बोलताना ही माहिती दिली. भाजपाचा जाहीरनामा टप्प्या टप्प्याने प्रसिद्ध केला जाईल. झारखंड राज्याच्या निर्मितीला २५ वर्षं पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर या जाहीरनाम्यातही २५ मुद्दे असतील. भगवान बिरसा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंतीपूर्वी भाजपाकडून राज्याच्या विकासासाठी १५० आश्वासनं जाहीर केली जातील. येत्या वर्ष अखेरीला झारखंडमध्ये निवडणुका होणार आहेत.

<><><><>

दक्षिण लेबनॉनमध्ये काल हिजबुल्लासोबत झालेल्या संघर्षात इस्त्रायलचे आठ सैनिक ठार झाल्याचं इस्त्रायलच्या सैन्यानं सांगितलं आहे. इस्त्रायलनं सैनिकी कारवाई केल्यानंतर उत्तरादाखल हिजबुल्लानं हा हल्ला केला. एका व्हिडिओ

संदेशात इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी याबाबत शोक व्यक्त केला आहे. ते पुढे म्हणाले की, या हल्ल्याला जशास तसं उत्तर दिलं जाईल. इराणलाही याचे परिणाम भोगावे लागतील. इस्त्रायलची सुरक्षितता सुनिश्चित करण्याचही त्यांनी वचन दिलं. इस्त्रायली हवाई दलानं बैरूतच्या दक्षिणेकडील उपनगरातील हिजबुल्लाच्या तळावर रात्रभर हल्ले केले. गेल्या २४ तासात इस्त्रायली हल्ल्यांमध्ये किमान ५५ जणांचा मृत्यू आणि १५६ जण जखमी झाल्याची लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयानं कळवलं आहे. तसंच गेल्या दोन आठवड्यांत १ हजारापेक्षा जास्त मृत्यू आणि सुमारे दहा लाख लोक विस्थापित झाल्याची नोंद झाली आहे. दरम्यान, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान म्हणाले की, इराण युद्धाचा प्रयत्न करत नाही, परंतु इस्त्रायलनं हल्ला केला, तर त्याला प्रत्युत्तर दिलं जाईल.

<><><><>

मध्यपूर्वेत तणाव वाढल्यामुळे हवाई वाहतुक मोठ्या प्रमाणात प्रभावित झाली आहे. फ्लाईट रडार-२४ च्या माहितीनुसार, जगभरातल्या विमान कंपन्या त्यांची विमानं अन्य मार्गाने वळवत आहेत किंवा रद्द करत आहेत, तर लेबनॉन, इस्त्रायल आणि कुवेतमधील प्रादेशिक विमान उड्डाणांना विलंब होत आहे. युरोपियन युनियन एव्हिएशन सेफ्टी एजन्सी (EASA) नं सर्व युरोपियन विमान कंपन्यांना इराणी हवाई क्षेत्र टाळण्याचा सल्ला दिला आहे. दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळातली ८५ टक्के विमानांची उड्डाणं प्रभावित झाल्याचं प्रशासनानं कळवलं आहे.

<><><><>

इस्त्राइल - इराण युद्धाचा मोठा परिणाम आज देशातल्या शेअर बाजारात दिसून आला. सेन्सेक्स सध्या पंधराशे हून अधिक अंकांनी घसरुन ८२ हजार ६०० अंकांच्या जवळ व्यवहार करतो आहे. निफ्टी सुमारे ५०० अंकांनी घसरुन २५ हजार ३०० अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता

३ ऑक्टोबर २०२४ - गुरुवार

<><><><>

हिंद- प्रशांत महासागर क्षेत्रात सुरक्षितता आणि भूराजकीय संदर्भ या विषयावर भारतीय नौदलाची तीन दिवसीय परिषद आजपासून नवी दिल्ली इथं होत आहे. सागरी क्षेत्रात साधनसंपत्तीचे नवे स्त्रोत आणि त्याचा आंतरराष्ट्रीय राजकारणावरचे परिणाम याविषयी परिषदेत उच्च स्तरीय विचारविमर्श होणार आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग उद्या परिषदेला संबोधित करणार आहेत.

<><><><>

हैदराबाद क्रिकेट असोसिएशनशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीनं आज माजी अध्यक्ष आणि क्रिकेटपटू मोहम्मद अझरुद्दीन याला समन्स बजावलं. अझरुद्दीनवर आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात निधीचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. या आर्थिक व्यवहारांबाबत चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश ईडीने दिले आहेत. उप्पल इथल्या राजीव गांधी क्रिकेट मैदानासाठी डिझेल जनरेटर आणि अग्निशमन यंत्रणेच्या खरेदीमध्ये २० कोटी रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार ईडीकडे दाखल झाली होती. त्या तक्रारीनंतर गेल्या वर्षी ईडीनं तेलंगणात नऊ ठिकाणी छापेमारी केली होती.

<><><><>

**केंद्रीय** गृहमंत्री अमित शाह आजपासून दोन दिवस  गुजरातच्या दौऱ्यावर असून त्यांच्या हस्ते गांधीनगर इथं विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन होणार आहे. अहमदाबाद महानगरपालिकेच्या सुमारे ४४६ कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांची पायाभरणी देखील शाह करतील. साणंद इथं ते भाजपा कार्यकर्ता संमेलनात भाग घेतील. त्याचप्रमाणे गुजरात पर्यटन महामंडळातर्फे आयोजित व्हायब्रंट गुजरात नवरात्री उत्सवाचं उद्घाटन करतील.

अहमदाबादमधल्या इतर नवरात्रौत्सव मंडळांच्या कार्यक्रमांनाही ते भेट देतील.

<><><><><>

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी ठाणे पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे. संबंधित शाळा आदर्श विद्यालय संस्थेचे अध्यक्ष उदय कोतवाल आणि कार्यवाह तुषार आपटे या दोघांना गुन्हे अन्वेषण शाखेनं कर्जतमधून ताब्यात घेतलं. या दोघांचा अटकपूर्व जामीनासाठीचा अर्ज काल मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळला. त्यांना नंतर विशेष तपास पथकाच्या ताब्यात देण्यात आल्याचं ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी सांगितलं. या दोघांवर पोक्सो कायद्याअंतर्गत लैंगिक अत्याचाराची तक्रार दाखल न केल्याचा आरोप आहे. विशेष तपास पथकानं याप्रकरणी दोन आरोपपत्रं दाखल केली आहेत.

<><><><><>

महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेला आजपासून शारजा इथं सुरुवात होत आहे. उद्घाटनाचा सामना बांग्लादेश आणि प्रथमच खेळणारा स्कॉटलंडचा संघ यांच्यात होणार आहे . सामन्याला दुपारी साडेतीन वाजता सुरुवात होईल. भारताचा पहिला सामना उद्या न्यूझीलंडसोबत होणार आहे. येत्या २० ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत दहा संघ उतरले आहेत. या स्पर्धेत मागील तिनही वेळा ऑस्ट्रेलियानं विजेतेपद मिळवलं असून भारतीय संघाला अद्याप एकदाही विजेतेपद मिळालेलं नाही. यंदा मुख्य स्पर्धेपूर्वी झालेल्या सराव सामन्यांमध्ये भारतीय महिलांनी दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज यांना पराभूत केलं.

<><><><><>

जागतिक बुद्धिबळ स्पर्धेच्या दुसऱ्या आवृत्तीची सुरुवात उद्यापासून लंडन इथे होणार आहे. या स्पर्धेत एकूण ३६ खेळाडू सहभागी होणार आहेत.

<><><><><>

चीन इथं सुरू असलेल्या चीन खुल्या टेनीस स्पर्धेत  फेरीत स्पेनच्या कार्लोस अल्कराझनं गतविजेता प्रथम मानांकित जन्नीक सिन्नर याचा ६-७,६-४,७-६ असा सरळ सेट मध्ये पराभव केरत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

//<><><><><>//